# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/3378

दिनांक :- 26 OCT 2016

प्रति,

**प्राचार्य,**

विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र, पदविका व पदवी

तसेच विनाअनुदानित एम.बी.ए./एमसीए पदव्युत्तर पदवी संस्था.

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेबाबत सबंधित संस्थेनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक माहिती (Qualification Details) अद्यावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्रमांक :- टीईएम २०१५/प्र.क्र.२१९/तांशि ४ दि. ३१/३/२०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती मिळण्याकरीता ई.बी.सी. अर्ज सबंधित जिल्हयातील शासकीय संस्थेकडुन तपासणी अधिकारी यांचेकडुन शासन निर्णय क्रमांक टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि ४ दिनांक ३१ मार्च २०१६ नुसार तपासणी करुन घेऊन या कार्यालयास सादर केलेले आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील ई.बी.सी. पात्र धारक विद्यार्थ्यांना सबंधित योजनेचा लाभ मिळण्याचे दृष्टीने आपल्या स्तरावर ई.बी.सी. पात्र विद्यार्थ्यांचे निकाल तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संकेतस्थळावर अद्यावत करणे बंधनकारक असुन अजुनपर्यंत सदर माहिती अद्यावत केली नसल्याचे दिसुन येते.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षापासून ते आजपर्यंत दोन्ही सत्रातील निकालाची माहिती तात्काळ अद्ययावत करावी. तसे न केल्यास काही अर्ज नामंजूर किंवा शुल्क प्रतीपुर्तीची रक्कम मिळण्यास विलंब झाल्यास आपली संस्था सर्वस्वी जबाबदार राहिल, याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.